# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (स्थापना विभाग)

**जाहिरात क्र. 617/ज.स./2020** **दि. 04/01/2020**

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेच्या सचिवालय विभागातर्फे करण्यात येत असलेल्या खालील कामांकरिता महाराष्ट्र शासकीय सेवेतील, नागपूर महानगरपालिकेतील किंवा इतर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त ''निगम सचिव'' या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांना खालील नमूद कामाचा किमान 2 वर्षाचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्याची समिती विभागा अंतर्गत ''सचिवालय सल्लागार'' या पदावर कंत्राटी तत्वावर शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमतः 6 महिन्याच्या कालावधीकरिता नियुक्त करावयाची आहे.

त्या करिता पात्र सेवानिवृत्त इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 10/01/2020 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (III), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | वयोमर्यादा | अनुभव. |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिवालय सल्लागार | 01 | कमाल 65 वर्षे | 1) महाराष्ट्र शासकीय सेवेतील, नागपूर महानगरपालिकेतील किंवा इतर शासकीय सेवेतील ''निगम सचिव'' या पदावरून सेवानिवृत्त झालेले.<br>2) सचिवालय विभागातर्फे करण्यात येत असलेले महानगरपालिका सभा, स्थायी समिती, विशेष समिती, प्रभाग समिती व परिवहन समितीची विषय पत्रिका काढणे, सभेचे आयोजन करणे, इतिवृत्त तयार करणे, प्रश्न उत्तर, नोटीस, स्थगन प्रस्ताव, ATR , इतिवृत्त अहवाल कायम करण्यास सादर करणे, इत्यादी महत्वाची कामे तसेच पुढील कालावधीसाठी विद्यमान स्थायी समितीच्या सदस्यांना निवृत्त करण्याची प्रक्रीया तसेच निवृत्त होणाऱ्या सदस्या ऐवजी नवीन सदस्यांची नियुक्तीची प्रक्रीया व स्थायी समिती सभापतीची निवडणूक त्यानंतर समितीचे पुनर्गठन, प्रभाग समिती सभापतीची निवडणूक, विशेष समिती, सभापती व उपसभापतीची निवडणूक, महानगरपालिका वार्षिक अंदाजपत्रक व परिवहन समितीच्या सभापतीची निवडणूक घेणे इत्यादी कामांचा किमान 2 वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव तसेच MMC Act सभा कामकाज नियमावली याबाबत इत्यंभूत माहिती असावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 3) सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>4) सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. |

वरील उमेदवारांनी दि. 10/01/2020 रोजी सकाळी 10:30 ते 12.00 पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणा—या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यांत येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अर्हता :—

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
2) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति. आयुक्त (III), नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे सादर करावेत.
3) वयोमर्यादा विचारात घेतांना दि.10/01/2020 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.
4) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती सांक्षाकिंत करून जोडाव्यात.
5) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.
6) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र /हमीपत्र उमेद्वाराला दयावे लागेल.
7) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.
8) मासिक पारिश्रमिक — शासकीय /निमशासकीय सेवा— सेवानिवृत्त अधिका—यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करून करार पध्दतीने नेमणूक करातांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता /अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/— अभिजीत बांगर
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

दि. 04/01/2020

# <u>अर्जाचा नमूना</u>

फोटो

1. पदाचे नाव :– ..............................................................

2. अर्जदाराचे नांव :– ..............................................................

3. पूर्ण पत्ता :– ..................................................................
..................................................................
..................................................................
भ्रमणध्वनी क्रमांक :– ................................................................
ई–मेल आय डी :– ................................................................

4. जन्म दिनांक :– .................................................................

5. दि. 10/01 /2020 ला वय :– .................................................................

6. सेवानिवृत्तीचे वेळी धारण
केलेले पद व कार्यालय :– .................................................................

7. शैक्षणिक पात्रता :– .................................................................
.................................................................

8. अ) सेवाकाळातील विभागीय चौकशी
सुरू आहे/होती काय?
ब) असल्यास विभागीय चौकशीत शिक्षा
झाली होती का?

9. अनुभव :–

| अ. क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून – पर्यन्त) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

स्वाक्षरी